# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे

# संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा

## २.१ प्रस्तावना -

पहिल्या प्रकरणात संशोधन समस्येची पार्श्वभूमी, संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या, उद्दिष्टे, गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा इ. गोष्टी पाहिल्या. प्रत्यक्ष समस्येचा सविस्तर अभ्यास करण्यापूर्वी प्रस्तुत संशोधनाशी संबंधित महत्त्वाच्या उपलब्ध साहित्याचा व संशोधनाचा थोडक्यात आढावा घेणे अधिक श्रेयस्कर होईल.

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात साहित्य व संशोधनाचा आढावा घेतलेला आहे. या प्रकरणाची विभागणी दोन भागात करण्यात आलेली असून पहिल्या भागात संबंधीत साहित्याचा आढावा तर दुसऱ्या भागात संबंधित संशोधनाचा आढावा घेतलेला आहे.

## २.२ संबंधित साहित्याचा आढावा -

संशोधिकेने स्वतः घेतलेल्या व्यक्तीगत अनुभवांवरुन व अभ्यासलेल्या साहित्यांवरुन असे आढळते की, पौगंडावस्थेतील घटकांचा सर्वांगिण विकास समाधानकारक न होण्यामागे काही कारणे आहेत. त्यापैकी काही कारणे या घटकांच्या कौटुंबिक स्थितीविषयक, तर काही शाळा विषयक तर काही कारणे त्यांच्या पालकांच्या सामाजिक स्थितीशी निगडीत आहेत.

मागील प्रकरणात सूचित केल्याप्रमाणे पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. या वयोगटातील मुला - मुलींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सद्यःस्थितीत या समस्येचा सर्व बाजूंनी अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असणारी माहिती काही पुस्तके, मासिके , वर्तमानपत्रे , हस्तपुस्तिका संशोधिकेने संदर्भ साहित्य म्हणून वापरले आहे, ते पुढीलप्रमाणे -

## २.२.१ *जीवन कौशल्य विषयक संदर्भ साहित्य*

### *१ पुस्तके -*

**१) शिंदे, वाय. के. (२०००). व्यक्तीमत्व संजीवनी. एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट इस्टिटयूट, पोसेवाडी , ता. खानापूर, जि. सांगली, महाराष्ट्र.**

वाय. के. शिंदे यांच्या व्यक्तीमत्व संजीवनी या पुस्तकामध्ये त्यांनी सोळा जीवनाधिष्टीत मूल्ये सांगितली आहेत. ही जीवनमूल्ये मूलांमध्ये कशी रुजविण्यात येतील याविषयीचे विवेचन या पुस्तकामध्ये आलेले आहे. संशोधिकेने संशोधन विषयातील निवडलेल्या स्वत्वाची जाणीव , परिणामकारक सुसंवाद , समस्या निराकरण , निर्णय क्षमता , सर्जनशीलता इत्यादी कौशल्यांचा अंतर्भाव या मूल्यांमध्ये आहे, म्हणून वाय. के. शिंदे यांचे व्यक्तीमत्त्व संजीवनी हे पुस्तक संशोधनासाठी उपयोगी पडले आहे.

**२) शिंदे, वाय. के. (२०००). शिक्षक संजीवनी . एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट इस्टिटयूट, पोसेवाडी , ता. खानापूर, जि. सांगली, महाराष्ट्र.**

वाय. के. शिंदे यांच्या **शिक्षक संजीवन** या पुस्तकामध्ये शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षकाला असणारे अनमोल स्थान विषद केले. या पुस्तकात पौंगडावस्थेतील मुलांचा शारीरिक व मानसिक विकास करण्यासाठी जीवन कौशल्य कशी उपयुक्त आहेत, हे सांगीतले आहे. संशोधिकेचा अभ्यास विषय हा पौगंडावस्थेतील आरोग्य शिक्षण हा असल्याने शिक्षक संजीवनी हे पुस्तक संशोधनासाठी अतिशय उपयुक्त पडले.

**३) शिंदे , वाय. के. (२००७). पालक संजीवनी. एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट इस्टिटयूट, पोसेवाडी , ता. खानापूर, जि. सांगली, महाराष्ट्र.**

वाय. के. शिंदे यांच्या **पालक संजीवनी** या पुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये पालकांची भूमीका कशी महत्त्वपूर्ण आहे, हे विषद केले आहे. आजच्या पालकांचा दिनक्रम बदलला आहे. मुलांच्या activities कडे लक्ष द्यायला पालकांना वेळ नाही, त्यांच्या जीवन शैलीत बदल

झाला आहे. पालकांना भौतिक गोष्टीत, पैसा कमावण्यात रस असल्याने मुलांच्या समस्या समजून घेवून दूर करण्यास वेळ नाही, म्हणून आज बालक - पालक संघ, पाळणाघर यांची निर्मिती झाली आहे. परंतू असे असले तरी ही मुलांच्या विकासामध्ये पालकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.पौगंडावस्थेचा कालखंड हा वादळी कालखंड असल्याने या काळात पालकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, असे या पुस्तकात विशद केले आहे. संशोधिकेचा अभ्यास विषय पौंगडावस्थेतील शिक्षण हा असल्याने हे पुस्तक संशोधनासाठी अतिशय उपयुक्त पडले

## *२. मासिके*

**१) करंबे, जयश्री. (२००७). व्यक्तीमत्व व समायोजन. शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००५.**

व्यक्तीचे व्यक्तीमत्व म्हणजे फक्त त्याचे दिसणे नसून त्यात व्यक्तीचे शारीरिक , मानसिक , भावनिक, अध्यात्मिक, सांस्कृतीक बाबी तसेच त्याच्या स्वत:शी व इतरांशी असलेल्या वर्तनाचा समावेश होतो. या लेखामध्ये व्यक्तीमत्त्वाचे शारीरिक, मानसिक पैलू सांगितले आहेत. त्याचबरोबर या लेखामध्ये व्यक्तीमत्त्व कौशल्य म्हणून संप्रेषण / संवाद कौशल्य , तडजोड /वाटाघाटीचे कौशल्य , अंतर व्यक्तीत्त्व कौशल्य , नेतृत्त्व कौशल्य, या कौशल्यांचा अंतर्भाव केलेला आहे. संशोधनाचा विषय जीवनकौशल्यावर आधारित असल्याने हा लेख मार्गदर्शक ठरला.

**२) काथवटे, शरद. (२००८). जीवन कौशल्यांचे शिक्षण. जीवन शिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०.**

जीवन कौशल्यांचे शिक्षण या शदर काथवटे यांच्या लेखामध्ये जीवन कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून मुलांच्या मानसिक व भावनिक समस्यांचे निराकरण करता येते असे सांगितले आहे. या लेखामध्ये -

१) स्वयम् जागृती २) परिणामकारक सुसंवाद ३) समस्या निराकरण ४) निर्णय क्षमता

16393

५)सृजनात्मक विचार ६) चिकित्सक विचार ७) तणाव अनूकुलन ८) परस्पर संबंध कौशल्य ९) संवेदन अनुकूलन इ. कौशल्यांची माहिती या लेखात असल्याने संशोधनासाठी हा लेख अतिशय उपयुक्त ठरला.

**३)खाडिलकर, प्रभाकर (२००८). <u>व्यक्तीमत्व विकास- उत्तमतेकडे प्रवास.</u> शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**

या लेखामध्ये प्रभाकर खाडिलकरांनी शारीरिक, बौध्दिक संवाद, व्यावसायिक कौशल्य या विषयी माहिती दिली आहे. कौशल्य वाढविण्यासाठी निटनेटकेपणा, समयपालन, स्वावलंबन, कष्टाची तयारी या गोष्टी कौशल्य वाढीसाठी आवश्यक आहेत असे सांगितले आहे. प्रस्तुत संशोधन विषय हा जीवन कौशल्य हा असल्याने प्रस्तुत लेख हा संशोधनास मार्गदर्शक ठरला आहे.

**४) सावंत, विद्या. वसंत (२००८). <u>लैगिक शिक्षण की जीवन कौशल्य शिक्षण.</u> भारतीय शिक्षण.**

लैंगिक शिक्षण की जीवन कौशल्य शिक्षण या लेखामध्ये विद्या सावंत यांनी लैंगिक शिक्षणापेक्षा जीवन कौशल्याचे शिक्षण देणे आजच्या काळाची गरज आहे असे सांगितले. त्यांच्या मते पौगंडावस्थेच्या काळात जर जीवन कौशल्य रुजली तर लैगिक शिक्षण स्वतंत्रपणे देण्याची गरज नाही. संशोधिकेच्या संशोधनाचा विषय जीवन कौशल्य शिक्षण हा असल्याने हा लेख संशोधनासाठी अतिशय उपयुक्त आहे.

5) Moly, Kuruvilla (2008) <u>Women Empowerment : A Life Skill Education Approach University News :</u> A weekly Journal of High Education Published by the Association of Indian Unversities.

मौली आणि कुरुविला दोन तज्ञांनी स्त्री सबलीकरण या विषयासंदर्भात जीवनकौशल्यांच्या शिक्षणाविषयी आपले काही विचार प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते आपली सद्याची शिक्षणपद्धती ही मुली वा स्त्रीया यांचा सामाजिक दर्जा व सुरक्षा साध्य करण्यास अपूर्ण आहे वा अयशस्वी ठरली हे स्त्रीया व मुली यांच्यावर होणा-या सामाजिक व शारीरिक अन्यायांच्या अनेक बातम्यावरुन सिध्द होते. स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उंचावण्याचे प्रयत्न चालू असतानाच तो घसरत आहे असे जाणवते. या बाबतीत शासन अनेक सामाजिक संस्था व केंद्रे यांचे प्रयत्न अपुरे आहेत म्हणून संघटीतपणे या संस्थांनी व संघटनांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यापुढे स्त्री सबलीकरणाबाबत मुग गिळून बसणे आपल्याला परवडणारे नाही. मानसिक, बौध्दिक, शारीरिक , भावनिक विकासाच्या संदर्भात जागृत असणे तसेच स्त्रीया व मुलींच्या सुरक्षिततेसाठी अधिक दक्ष राहून त्यांचा मानसिक, शारीरिक व लैंगिक छळ होणार नाही अशी सामाजिक जाणीव अधिक तीव्र करणे हे शासन व विविध सामाजिक संघटना व केंद्र यांचे काम आहे व त्यांनी एकत्रितपणे दृढनिश्चयाने ते केले पाहिजे व स्त्रीयांसाठी विविध जीवनकौशल्याचा शिक्षणाच्या माध्यमातून उपयोग केला पाहिजे.

### *३ पुस्तिका - (मराठी)*

**१) महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था (२००५). <u>महाराष्ट्र माध्यमिक शाळांच्या शिक्षकांसाठी शालेय किशोरवयीन जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम कार्य-पुस्तिका</u>. महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था, आर.ए.किडवाई मार्ग, वडाळा (प), मुंबई.**

महाराष्ट्र राज्यामध्ये १९९४ पासून शालेय किशोरवयीन जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम शासनामार्फत राबविला जात आहे. महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण सोसायटीने आश्रमशाळा, मुलींच्या शाळा व इतर माध्यमिक शाळांमधील ९ वी व ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम हाती घेतलेला आहे व त्याकरिता ही कार्य पुस्तिका शिक्षिकांनसाठी तयार केली आहे.

संशोधिकेचा संशोधन अभ्यासाचा विषय जीवन कौशल्य शिक्षण असल्याने ही कार्य-पुस्तिका उपयुक्त ठरली.

**२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (२००८). जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका (इयत्ता १ ली ते ४ थी) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-४११ ०३०.**

विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपल्या देशात विविध पातळयांवरुन सर्वंकष प्रयत्न होत आहेत. या मार्गदर्शिकेत "स्व" ची जाणीव, समानानुभूती, परिणामकारक संप्रेषण, व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध, समस्या निराकरण चिकित्सक विचार, सर्जनशील सुसंवाद, निर्णयक्षमता, ताणतणावांचे समायोजन, भावनांचे समायोजन या १० जीवन कौशल्यांची ओळख करुन दिली आहे. संशोधिकेने संशोधनासाठी निवडलेल्या ५ जीवन कौशल्यांचा अंतर्भाव या मार्गदर्शिकेत असल्याने ही मार्गदर्शिका संशोधनासाठी अतिशय उपयुक्त ठरली.

### *४) इंग्रजी पुस्तिका*

Unicef, (2008). Life skills Education standard 1-7 Application Teachers Guide. Vidhyabhavan Sector 12, Gandhinagar.

इयत्ता १-७ वी साठी असलेल्या जीवन कौशल्य या मार्गदर्शिकेत "स्व" ची जाणीव, समानानुभूती, परिणामकारक संप्रेषण, व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध, समस्या निराकरण चिकित्सक विचार, सर्जनशील विचार, निर्णयक्षमता, ताणतणावांचे समायोजन, भावनांचे समायोजन या १० जीवन कौशल्यांची ओळख करुन दिली आहे. त्याच बरोबर ही कौशल्य मुलांमध्ये रुजविण्यासाठी आवश्यक असणारे विविध उपक्रम या मार्गदर्शिकेत दिले आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारे जीवन कौशल्याशी संबंधित आरोग्य जाणीव विषयक

उपक्रम निश्चित करण्यासाठी या मार्गदर्शिकेचा खूप चांगला उपयोग झाला.त्यामुळे ही मार्गदर्शिका संशोधनासाठी अतिशय उपयुक्त ठरली.

**5 Internet –**

**Unicef (2008). Life Skills Education. http:/www unicef. Org/lifeskills / index 4105.html.**

युनिसेफ, जागतिक आरोग्य संघटना, जीवन कौशल्याविषयी एक वेबसाईट प्रसारीत केली आहे. त्यात त्यांनी जीवन कौशल्याची निश्चित व एकच एक यादी देता येणार नाही असे नमूद केले आहे तरी ही त्यांनी मार्गदर्शन म्हणून दहा जीवन कौशल्यांचा आवर्जुन उल्लेख केला आहे.

सामाजिक स्थिती, स्थल काल परिस्थितीनुसार निरनिराळया, वेगवेगळया परिस्थितीत वेगवेगळया समस्या योग्यप्रकारे हाताळताना वेगवेगळया पध्दतीने जीवन कौशल्यांचा वेगवेगळे सामाजिक गट उपयोग करतील. त्यात काही प्रतिबंधात्मक तर काही उपचारात्मक उपक्रमांचा व कौशल्यांचा वापर होवू शकतो.

***६ वर्तमान पत्रे -***

**१) अन्वीकर, मधुरा. (२००७). देहबोली : संवादाचे अविभाज्य अंग . सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ, पुणे .**

माध्यमे बदलली तरी काही मूलभूत गोष्टी तशाच राहिल्या. त्यापैकी एक म्हणजे अभाषिक संदेशांची देवाण-घेवाण शब्दांच्या जोडीला आणि काही वेळा शब्दांशिवाय शरीराच्या विविध अवयवांव्दारे, शारीरिक क्रियांव्दारे कळत - नकळत पाठविलेल्या शाब्दिक संदेशांना पूरक म्हणजेच देहबोली होय. असे या लेखात संवादाविषयी सांगितले आहे. संशोधीकेने निवडलेल्या कौशल्यापैकी संवाद कौशल्य हे महत्त्वाचे कौशल्य असल्याने हा लेख उपयुक्त ठरला.

**२)कुलकर्णी, मुकुंद. (२००८). व्यक्तिमत्व आणि व्यवस्थापन. सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ, पुणे.**

मुकुंद कुलकर्णी यांच्या मते व्यक्तिमत्व विकासाचे मूळ व्यवस्थापन कौशल्यातच दडलेले असते. ही कौशल्य म्हणजे नियोजन, संयोजन, मार्गदर्शन, प्रेरणा, आढावा व नियंत्रण, निर्णय प्रक्रिया, समस्या निर्मूलन होय. संशोधिकेने निवडलेला संशोधन विषय जीवन कौशल्य हा असल्याने या व्यक्तिमत्व आणि व्यवस्थापन हया लेखामध्ये सांगितलेली निर्णय प्रक्रिया, समस्या निर्मूलन या कौशल्याची माहिती संशोधनास उपयुक्त ठरली.

**३) भोसले, सुषमा जयंत (२००८) असा मी ? कसा मी ? सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ पुणे.**

सुषमा भोसले यांच्या असा मी ? कसा मी ? या लेखामध्ये व्यक्तीची स्व-प्रतिमा कशी असावी याविषयी माहिती सांगितली आहे. संशोधिकेने संशोधनासाठी निवडलेल्या ५ कौशल्यापैकी स्वत्वाची जाणीव या कौशल्याविषयी या लेखामध्ये माहिती आहे. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू या लेख आले असल्याने संशोधन अभ्यासासाठी हा लेख उपयुक्त ठरला.

**४) भोसले, सुषमा. जयंत. (२००८). निरीक्षण करा कल्पक व्हा. सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ, पुणे.**

प्रा.सुषमा भोसले यांनी आपल्या निरीक्षण करा व कल्पक व्हा या लेखामध्ये सर्जनशीलता / कल्पकता वाढविण्यासाठी चौकस निरीक्षण, संवेदनशीलतेत वाढ, जोखीम घेण्याची तयारी , स्वतंत्रपणे विचार करण्याची वृत्ती, अंधानुकरण टाळा या गोष्टीची गरज आहे असे सांगितले आहे. संशोधिकेच्या संशोधनासाठी निवडलेल्या कौशल्यामध्ये सृजनशीलता हे कौशल्य असल्याने हा लेख संशोधनासाठी उपयुक्त ठरला.

**५) भोसले, सुषमा जयंत (२००८) <u>वाढवा करिअरचा ग्राफ.</u> सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ, पुणे.**

सुषमा भोसले यांच्या वाढवा करिअरचा ग्राफ या लेखामध्ये आयुष्यात सर्वोत्तम संधी मिळवायची तर तंत्रज्ञानाबरोबरच माणसांशी संवाद साधणे, जुळवून घेणेही क्रमप्राप्त आहे आणि त्यासाठी आवश्यकता आहे ती सॉफ्ट स्कील्सची . सॉफ्ट स्कील्स म्हणजे सर्जनशीलता, प्रेरणा, भावनिक बुध्दिमता, निर्णयप्रक्रिया, प्रभावी देहबोली, समस्यापरिहार कौशल्य, संघभावना जोपासणे ही होय . ही सॉफ्ट स्कील्स म्हणजेच जीवन कौशल्य आहेत म्हणून हा लेख प्रस्तुत संशोधनासाठी अतिशय उपयुक्त ठरला.

**६) देशकर, दत्ता. (२००८). <u>सुसंवाद कसा वाढवाल</u> ? सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ, पुणे .**

सुसंवाद कसा वाढवाल? या लेखात दत्ता देशकर यांनी संवाद, विसंवाद आणि परिणामकारक सुसंवाद हया तीन शब्दांचा अर्थ सांगितला आहे. आजच्या युगात संवादाला फारच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे ही बाब लक्षात येईल. त्यामुळे हे कौशल्य प्राप्त करुन घेणे हे प्रत्येकासाठी गरजेचे ठरते. प्रयत्न करुन हे कौशल्य प्राप्त करुन घेऊ शकतो. संशोधिकेने संशोधनासाठी निवडलेल्या कौशल्यांपैकी अतिशय महत्त्वाचे असे कौशल्य परिणामकारक सुसंवाद हे आहे त्यामुळे हा लेख संशोधला उपयुक्त ठरला.

**७) भोसले, सुषमा. जयंत.(२००८). <u>अचूक निर्णय कसा घ्यावा?</u> सकाळ जॉबझेड पुरवणी सकाळ , पुणे.**

सुषमा भोसले यांनी अचूक निर्णय कसा घ्यावा? या लेखामध्ये निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणा-या महत्त्वाच्या गोष्टी लेखात सांगितल्यात आहेत. सर्वांगीण विचार करुन योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आवश्यक असतं. मात्र अचूक निर्णयासाठी कॉमन सेन्स, असणही

तितकंच गरजेचं आहे असे सांगितले आहे. निर्णयक्षमता हे संशोधकाने निवडलेल्या कौशल्यातील महत्त्वाचे कौशल्य असल्याने हा लेख संशोधनाला अतिशय उपयुक्त ठरला.

### *२.२.२ पौगंडावस्था शिक्षण विषयक संदर्भ साहित्य -*

### *१ हस्त पुस्तिका (मराठी)*

**१) आय. ई. सी विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय कुटुंब कल्याण शाखा भारत सरकार. (२००४).पौगंडावस्थेतील आरोग्य, मूलभूत आरोग्यासाठी (कार्यकर्त्यांकरिता)प्रशिक्षण पुस्तिका . भारत सरकार कुटुंब कल्याण विभाग आरोग्य व कुटुंब कल्याण. मंत्रालय निर्माण भवन नवी दिल्ली - ११००११.**

तरुणाईच्या वयात होणा-या विशेष महत्त्वाच्या बदलाची स्थिती म्हणजे पौगंडावस्था (१० ते १९ वर्षे) होय. पौगंडावस्थेमध्ये होणारे बदल शारीराची स्वाभाविक वाढ असल्याचे लक्षात आणून देऊन त्याबाबत जाणीव जागृती करणे गरजेचे आहे.

ग्रामीण व शहरी भागातील पौगंडावस्थेतील तरुणांना याबाबतचे योग्य ज्ञान व समज निर्माण करण्यासाठी बहुविध आरोग्य कार्यकर्ते, सहाय्यक, परिचारिका, स्त्री अभ्यागता गट, विस्तार अधिकारी, अंगणवाडी कार्यकर्त्या व स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक यांच्यासाठी “पौगंडावस्थेतील आरोग्य” ही पुस्तिका तयार करण्यात आली. संशोधिकेचा संशोधन विषय पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन असल्याने ही पुस्तिका संशोधनासाठी उपयुक्त ठरते.

**२) आरोग्य विभाग जिल्हा परिषद. (२००६). पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन कार्यक्रम हस्तपुस्तिका. आरोग्य विभाग जिल्हा परिषद,सातारा.**

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,सातारा यांच्या पौगंडाावस्थेतील आरोग्य संवर्धन कार्यक्रमाची माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे. भारतातील पिढी ही सर्वाधिक मोठया संख्येने पौगंडाावस्थेतून जात आहे. याच वयातील मुले एडस् सारख्या भयानक रोगांचे बळी

जातात. आणि त्यांचे सर्व जीवनच उध्दवस्त होवून जाते. या वयातील मुलांनाच योग्य मार्गदर्शनाची गरज असते, त्याच्या आयुष्याला योग्य दिशा प्राप्त करुन देण्याची गरज असते. हे काम सध्या सातारा जिल्हयातील आरोग्य विभाग करीत आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन कार्यक्रम पुस्तिका या पुस्तिकेचा उपयोग झाला.

**३) आरोग्य विभाग जिल्हा परिषद. (२००६). <u>पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन सेक्टर इनव्हेस्टमेंट प्रोग्राम</u>. आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सातारा.**

या हस्तपुस्तिकेमध्ये पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन या पुस्तिकेमध्ये मुली वयात येताना व मुले वयात येताना या विषयाच्या अंर्तगत या वयातील मुला-मुर्लीच्या मध्ये होणा-या बदलांची माहिती या पुस्तिकेत दिली आहे. तसेच या वयातील मुलांना कोणत्या पध्दतीचा आहार देण्यात यावा याचीही माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे. संशोधिकेच्या संशोधन विषयात पौगंडावस्था शिक्षणाचा अंर्तभाव होत असल्याने प्रस्तुत संशोधनासाठी ही पुस्तिका अतिशय उपयुक्त ठरली.

### *२. मासिके (मराठी)*

**१) पाटील, नलिनी रमेश. (२००७). <u>पौगंडावस्थेमधील शिक्षण.</u> शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००५.**

पाटील निलिनी यांनी पौगंडावस्थेमधील शिक्षण या आपल्या लेखामध्ये पौगंडावस्थेतील शिक्षण का द्यावयाचे ? पौगंडावस्था शिक्षण केव्हा द्यावयाचे ? पौगंडावस्था शिक्षण कोणी द्यावयाचे ? आणि पौगंडावस्था शिक्षण कसे द्यावयाचे ? या विषयावर चर्चा केली आहे. संशोधिकेच्या संशोधनविषयातील पौगंडावस्थेतील मुर्लीचे शिक्षण हा महत्त्वाचा घटक असल्याने हा लेख उपयुक्त ठरला.

### ३ वर्तमान पत्र -

**१) पाटकर, प्रदिप. (२००८). <u>कुमारवयीन मुले अशी का वागतात ?</u> लोकसत्ता मुबंई**

संशोधिकेने संशोधनासाठी निवडलेल्या विषयामध्ये पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन या विषयाचा अंतर्भाव होतो. प्रदिप पाटकर यांच्या प्रस्तुत लेखामध्ये कुमारवयीन मुले अशी का वागतात यामध्ये मुलांची मानसिक, शारीरिक, भावनिक व सामाजिक अवस्था सांगितली आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये पौगंडावस्थेतील मुलींच्या शारीरिक, मानसिक, भावनिक विकासाचा विचार केला आहे. त्यामुळे हा लेख प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरला .

### २.२.३ आरोग्यशिक्षण

**१) रोकडे, आर. पी. (२००० ). <u>बालपण आणि पौगंडावस्थेतील आहार.</u> आरोग्यपत्रिका राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे.**

आर. पी. रोकडे यांनी बालपण आणि पौगंडावस्थेतील आहार या आपल्या लेखामध्ये पौगंडावस्थेतील मुलांच्या जीवनातील आहाराचे महत्त्व विषद केले आहे. त्याचबरोबर मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास ती सुदृढ नागरिक कशी बनतील ? म्हणूनच मुलांसारख्या मौल्यवान संपत्तीचे जतन करण्याकरिता आपण कटिबध्द होवू असे सांगितले आहे. संशोधिकेचा संशोधन विषय पौगंडावस्थेतील आरोग्य शिक्षण हा असल्याने हा लेख संशोधनासाठी उपयुक्त ठरला.

**२) पगारे, एम.डी. (२००४). <u>सार्वजनिक आरोग्य, सुपोषण, स्वच्छता व कुटुंबकल्याण.</u> आरोग्यपत्रिका राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे.**

एम. डी. पगारे यांच्या सार्वजनिक आरोग्य, सुपोषण, स्वच्छता व कुटुंबकल्याण या लेखामध्ये सर्वांसाठी आरोग्य ही संकल्पना मांडली आहे. या लेखामध्ये सरकारने आरोग्यासाठी आजपर्यंत आखलेल्या योजना व कितपत अमलात आणल्या गेल्या याची माहिती या लेखात आहे. आरोग्य हा संशोधन अभ्यासाचा विषय असल्याने हा लेख संशोधनासाठी उपयुक्त ठरला.

**३) को-हाळकर, मकरंद. पु. (२००६). <u>शरीर व आरोग्य शिक्षण अभ्यासक्रम.</u> शिक्षण संक्रमण. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००५.**

मकरंद को-हाळकर यांच्या शरीर व आरोग्य शिक्षण अभ्यासक्रम या लेखामध्ये शरीरिक विकासाचे विदयार्थ्यांच्या जीवनात असणारे महत्त्व सांगीतले आहे. आरोग्याधिष्ठित सुदृढता, शारीरिक क्षमतेचा विकास, आनंददायी व क्रियाशील मनोरंजन, वस्तूनिष्ठ व सातत्यपूर्ण मूल्यमापन हया गोष्टीचा अंतर्भाव या लेखात आहे. संशोधिकेचे संशोधन हे आरोग्याशी निगडीत असल्याने हा लेख संशोधनास उपयुक्त ठरला.

**४) जोग, प्रमोद. (२००७). <u>आरोग्यशिक्षणाची लस.</u> शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००५.**

प्रमोद जोग यांनी आरोग्यशिक्षणाची लस या आपल्या लेखामध्ये आरोग्याचा पाया, स्वच्छतेच्या सवयी व आहाराचे महात्म्य सांगितले आहे. संशोधिका ही आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा अभ्यास करीत असल्याने आरोग्यशिक्षणाचे महत्त्व, आहाराचे महत्त्व, व्यायाम स्वच्छता या आणि अनेक गोष्टीची माहिती या लेखातून मिळाल्याने हा लेख संशोधनास उपयुक्त ठरला.

**५) पखाले, एस. आर. (२००७). <u>तरुण मुलामुलींचा आहार.</u> राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे.**

पखाले एस.आर. यांनी जनतेचे २५ टक्के लोक म्हणजे तरुण- तरुणीचा वर्ग हा १० ते १८ या वयोगटातील म्हणता येईल. आजची तरुण पिढी भारताचे भविष्य आहे या वयात मानसिक, शारीरिक व भावनिक बदल घडत असतात. म्हणूनच त्या दृष्टिकोनातून त्यांच्या खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते असे सांगितले आहे. संशोधकांचा संशोधन विषय हा आरोग्य शिक्षण असल्याने हा लेख प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरला.

**६) मंडले, पंकज (२००७) <u>संरक्षण उमलत्या कळयांचे.</u> आरोग्यपत्रिका राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे.**

पंकज मंडले यांच्या मते, Prevention is better than cure अशी म्हण इंग्रजीत प्रचलित आहे. १५ ते १८ या वयोगटातील माध्यमिक शाळेत शिकणा-या मुलांची संख्या जवळजवळ ४ करोड असल्याने त्यांना एडस् चे ज्ञान देणे म्हणजे वाढत्या रोगांना आळा घालणे आहे. उद्याच्या भावी पिढीचे भवितव्य घडविण्यासाठी त्यांचा सर्वांगिण विकास साधणे ही काळाची गरज आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा पौगंडावस्थेतील आरोग्य संर्वधन हा असल्याने प्रस्तुत लेख हा संशोधनास उपयुक्त ठरला.

**७) थिगळे, राजेंद्र. चंद्रकांत.(२००७). <u>लाल रेघांचा दवाखाना अर्थात</u> एज्युकेशनल क्लिनिक. शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००५.**

राजेंद्र थिंगळे यांच्या लाल रेषांचा दवाखाना अर्थात एज्युकेशनल क्लिनिक या लेखामध्ये शैक्षणिक दवाखाना ही नवीन संकल्पना मांडली आहे. खरे शिक्षण म्हणजे, बालकाचा सर्वांगीण विकास पण दुर्देवाने आपण फक्त त्या बालकाचा अभ्यासातील मागासलेपणा बघतो. प्रगतीपुस्तकातील लाल रेघा बघतो. पण सुरुवातीलाच त्या बालकाची तपासणी करुन मुळात ते बालक कसे आहे म्हणजे त्याची शारीरिक वाढ व क्षमता, मानसिक वाढ व क्षमता, भावनिक विकास व सामाजिकीकरण यासाठी संचित नोंद तक्ता असावा असे विचार त्यांनी लेखामध्ये मांडले आहेत . संशोधिकेचा संशोधन विषय पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन असल्याने हा लेख संशोधनास उपयुक्त ठरला.

**८) पाटील, जयवंत (२००८) <u>शालेय स्तरावर आरोग्य शिक्षणाची आवश्यकता.</u> शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००५.**

जयवंत पाटील यांनी शालेय स्तरावर आरोग्य शिक्षणाची आवश्यकता या आपल्या लेखामध्ये आरोग्य शिक्षणाचा अर्थ व क्षेत्रे, आरोग्य शिक्षणाचे घटक, आरोग्यशिक्षणाची आवश्यकता व महत्त्व, आरोग्य शिक्षण व शिक्षक, आरोग्य शिक्षणाचे उद्देश, शालेय स्तरावर आरोग्य शिक्षणाचे महत्व या सर्व बाबी या लेखामध्ये असल्याने हा लेख संशोधनास उपयुक्त आहे.

***२.३लेख -***

**1) Prasanthi, S. and Devi, T. Kalyani (2004). <u>Self concept of Adolescents in Urban and Rural Areas. Indian</u> Psychological Review Agra Psychological Research Cell Tiwari Kothi Belanganj,Agra 282004 (U.P.) India.**

***उद्दिष्टे -***

१) शहरी भाग व ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुला-मुलींचा स्व-संकल्पनेचा अभ्यास.

२) पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेतील लिंग फरकाचा अभ्यास करणे.

३) पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेतील श्रेणी फरकाचा अभ्यास करणे.

***निष्कर्ष -***

आग्रा विद्यापीठातील देवी कल्याणी व प्रसन्नती या तज्ञांना ग्रामीण व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या संकल्पनेविषयी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. एकूण स्थल, काल, परिस्थिती व लिंग या बाबतीत विचार करताना खालीलप्रमाणे आपली मते नोंदवली आहेत. ग्रामीण विभागातील मुला-मुलींपेक्षा शहरी विभागातील मुला-मुलींच्यामध्ये स्वत-संकल्पनेची जाणीव तीव्र दिसून येते. तसेच लिंगभिन्नतेचा या जाणीवेवर फारसा परिणाम होतो असे जाणवले नाही.

2) **Bhardwaj, Shweta. And Vashishtha, k.c. (2006). <u>An Empirical Exploration of Life Skills Relevant to Science and Technology .</u> Indian Educational Review vol. 42 no.2.**

***उद्दिष्टे -***

१) प्राथमिक शाळेतील मुला-मुलींच्या आवडीनुसार विज्ञान व तंत्रज्ञान यांना साजेशी किंवा उपयुक्त ठरणारी जीवनकौशल्य निवडणे.

२) प्राथमिक शाळेतील मुलांच्या संपादणूकीच्या आधारे विज्ञान व तंत्रज्ञान यांच्याशी निगडीत जीवन कौशंल्यांचे पृथ्थकरण करणे.

***निष्कर्ष -***

१) जीवन कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून मुल-मुली त्याच्यातील विविध क्षमतांचा विकास करण्याची तसेच व्यक्तीमत्व विकासाच्या संदर्भात आपल्या बलस्थानांची ओळख करुन घेतात.

२) मुला मुलींच्या जीवनाला विशिष्ट आकार व दर्जा प्राप्त करुन देणा-या अंर्तगत क्षमतांचा विकास शक्तींचा मानसिक व सामाजिक स्तरावर विकास होतो.

3) **Shalu and S. Audichya (2006). <u>A study on school Adjustment of Rural Adolescents.</u>Indian Psychological Review Agra Psychological Research Cell Tiwari Kothi Belanganj, Agra 282004 (U.P.) India**

*उद्दिष्टे -*

१) ग्रामीण विभागातील पौगंडावस्थेतील मुला मुर्लींच्या शालेय समायोजनाचा तौलनीक अभ्यास करणे.

२) ग्रामीण विभागातील पौगंडावस्थेतील मुला-मुर्लीचा भावनिक, सामाजिक व शैक्षणिक स्थितीची तुलना करणे.

*निष्कर्ष :-*

१) ग्रामीण विभागातील पौगंडावस्थेतील मुला- मुर्लींच्या आचार विचारात विशेष असा फरक जाणवला नाही.

२) ग्रामीण विभागातील पौगंडावस्थेतील मुला मुर्लींच्या भावनिक अवस्थांमध्ये दर्शनीय फरक जाणवला.

३) ग्रामीण विभागातील पौगंडावस्थेतील मुलांची भावनिक अवस्था ही मुर्लींच्या तुलनेत अधिक चांगली वाटली.

४) शैक्षणिक व सामाजिक दृष्टया पौगंडावस्थेतील ग्रामीण मुला - मुर्लींच्या बाबतीत दर्शनीय फरक जाणवला नाही.

**4) Moorjani, J. D. (2007) . Comparative study of youth problems Adolescents Girls. Indian Psychological Review Agra Psychological Research Cell Tiwari Kothi Belanganj, Agra 282004 (U.P.) India.**

***उद्दिष्टे -***

१) पौगंडावस्थेतील पदवीपूर्व शैक्षणिक स्तरावरील वस्तीगृहात राहणा-या वरीष्ठ आणि कनिष्ठ वयातील मुलींच्या प्रश्नांचा शोध घेणे.

२)वस्तीगृहात राहणा-या वेगवेगळया कौटुंबिक, सामाजिक कॉलेजमधील व भिन्न व्यक्तीमत्वाच्या तरुणींच्या प्रश्नांचा शोध घेणे.

***निष्कर्ष -***

१) सदरच्या अभ्यासातून कॉलेजला जाणा-या प्रौढ व लहान मुलींच्या प्रश्नांचा शोध घेण्यात आला. ज्युनियर मुलींच्या बाबतीत वेगवेगळया कुटुंबातील मुलींमध्ये प्रौढ मुलींपेक्षा अधिक प्रश्न दिसून आले. तर प्रौढ मुलींना व्यक्तीगत प्रश्नांना अधिक तोंड दयावे लागले.

२) नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रौढ मुलींना अधिक मार्गदर्शनाची गरज दिसून आली.

३) सर्वच मुलींना प्रबोधन व मार्गदर्शन यांची नितांत गरज वाटते. कारण प्रौढ व लहान मुलींच्या प्रश्नाचे स्वरुप वेगवेगळे जाणवते.

४) प्रौढ मुली व लहान मुली यांच्याबाबत प्रौढांना अधिक चांगला सन्मान मिळतो असे दिसून आले.

5) Prabha Jain and Suman Audichya (2007). Social Maturity and Social Acceptance of Adolescents. Indian Psychological Review Agra Psychological Research Cell Tiwari Kothi Belanganj, Agra 282004 (U.P.) India.

***निष्कर्ष -***

१) विदयार्थ्यांचे वर्गीकरण हे त्यांच्या आरोग्याच्या स्थितीवरुन करण्यात आले.

२) चांगले आरोग्य असणा-या मुलांची टक्केवारी जास्त आहे.

३) मुले आणि मुली यांच्या आरोग्यविषयक वर्गीकरणात तफाव आढळत नाही.

४) १,२,३,४ च्या सर्व गटातील मुले आणि मुलांच्या आरोग्यविषयक स्थिती व संपादणूकी विषयी सार्थ एकत्रीकरण आढळून आले.

५) प्रयोगासाठी निवडलेल्या संपूर्ण न्यादर्श असणा-या १,२,३,४ च्या सर्व मुला मुलींमध्ये आरोग्यविषयक स्थिती, बुध्दिमत्ता यामध्ये फरक नाही.

६) आरोग्यविषयक स्थितीमध्ये ५ पैकी ३ वर्गामध्ये बुध्दिमत्ता व संपादणूकीमध्ये सार्थ आणि होकारात्मक संबंध दिसून येतो.

## *२. ७ संदर्भ साहित्य व संबंधी संशोधनांचा प्रस्तुत संशोधनासाठी झालेला उपयोग.*

प्रस्तुत संशोधनामध्ये आरोग्य, ग्रामीण भाग, पौगंडावस्था, पौगंडावस्थेतील मुली तसेच जीवन कौशल्य या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधिकेने संदर्भ साहित्य म्हणून दिलेल्या साहित्यामध्ये वरील सर्व घटकांचा अंतर्भाव होत असल्याने हे साहित्य संशोधनास अतिशय उपयुक्त ठरले. त्याचप्रमाणे संबंधीत संशोधने म्हणून ज्या संशोधनाचा अंतर्भाव या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे, त्यांचे विषय पौगंडावस्था, आरोग्य शिक्षण व जीवन कौशल्य हे असल्याने प्रस्तुत संशोधनाच्या विषयाशी ते निगडीत असल्यामुळे ही संशोधने प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शक ठरली. प्रस्तुत प्रकरणामध्ये दिलेल्या जीवन कौशल्यावर आधारीत असणाऱ्या जीवन कौशल्य विषयक संशोधनातील कांही घटकांचा

उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी झाला. तसेच या संशोधनामध्ये घेतलेले पौगंडावस्था विषयीची संशोधने ही संशोधिकेस प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष लिहिताना अतिशय मार्गदर्शक ठरली.

## २. ६ *प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण*

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास करताना अनेक विषय समोर आले, या विषयामध्ये प्रामुख्याने पौगंडावस्थेतील मुलींच्या गरजा, त्यांची स्व संकल्पना, ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींचे शाळेतील समायोजन, ग्रामीण व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या स्व संकल्पना, पौगंडावस्थेतील मुलींच्या ठिकाणी असणारी आरोग्य विषयक जाणीव व त्यांची अभिवृत्ती अशा अनेक विषयावर आजपर्यन्त संशोधने झाली आहेत, परंतु पौगंडावस्थेतील मुलींच्या ठिकाणी आवश्यक जीवन कौशल्ये विकसीत करण्यासाठी आवश्यक असणारे संशोधन अभावानेच आढळते. तसेच ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य विषयक जाणीवा व जीवन कौशल्य यांचा विचार संशोधनाच्या दृष्टीने केला गेला नाही. आजची जगातील सगळयात मोठया प्रमाणावर पिढी ही पौगंडावस्थेतून जात आहे. या वयामध्ये या मुलांकडून अनेक चूका घडत असतात आणि या चुकांची परिणीती त्यांचे आयुष्य उध्वस्त होण्यामध्ये होत असते. या सगळयापासून या पिढीला जर वाचवायचे असेल तर पौगंडावस्थेतील या मुलांना योग्य पद्धतीने आरोग्य शिक्षण देवून त्यांच्यामध्ये योग्य जीवन कौशल्य रुजविली तर भावी पिढी ही निरोगी व निरामय निर्माण करता येईल, आणि त्यासाठी आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने निवडला.

**2) Kulshekhar (1983). <u>value orientations Interests and Attitudes as co-relates of self concept among Male and Female Adolescents.</u> (Fourth Survey of Research in Education (1983-1988).**

***उद्दिष्टे -***

१) मुला मुलींच्या पौगंडावस्थेतील मूल्य संवर्धन विषयक आवडी आणि नातेविषयक कल्पना यांच्या परिणामांचा मागोवा घेणे. (निश्चिती करणे)

२) मूल्य शिक्षण आवडी निवडी व नातेसंबंधाच्या व्दिस्तरीय व त्रिस्तरीय आदानप्रदान क्रियेचा कोणता परिणाम स्व-संकल्पनेवर होतो ते अभ्यासणे, की ज्यामुळे स्व-संकल्पनेचा विकास समजण्यास मदत होईल.

३) मुला मुलींच्या स्व जाणीवेच्या तफावती विषयी जाणून घेणे.

४) भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, सामाजिक अवस्थेतील विदयार्थ्यांच्या स्व संकल्पनेचा विकास जाणून घेणे.

***न्यादर्श -***

शहरी भागातील १५ ते १९ या वयोगटातील माध्यमिक स्तरावरील व महाविद्यालयात जाणा-या अलिघर येथील १६० विदयार्थ्यांची निवड संशोधनासाठी करण्यात आली.

***निष्कर्ष -***

१) पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या स्व जाणीवेवर मूल्य शिक्षणाचा परिणाम झाल्याचे जाणविले.

२) विविध आवडी निवडी असलेल्या मुला मुलींच्या स्व जाणीवेबाबत सकारात्मक परिणाम जाणवतो.

३) पौगंडावस्थेतील तरुणांमध्ये स्व संकल्पना विकासामध्ये त्यांच्या आवडी निवडी महत्त्व पूर्ण कार्य करतात. तसेच विविध नातेसंबंध व संस्था विषयीच्या संबंधांच्या मूल्य प्रबोधनामुळे स्व संकल्पना विकासात वाढ होते.

४) पौगंडावस्थेतील मुला मुलींमध्ये आवडी निवडी या स्व संकल्पनेच्या विकासाला योग्य आकार, योग्य वळण देतात.

५) आवडी निवडीच्या विविध घटनांचा पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या स्व संकल्पनेच्या विकासावर कमी अधिक परिणाम होतो.

**3)Kumari, S. (1981). <u>Self Esteem and Aspiration as Factors Affecting Risk taking.</u> (Fourth Survey of Research in Education Volume I (1983-1988).**

***उद्दिष्टे -***

१) धोका पत्करणारी वृत्ती किंवा असामाजिक किंवा अनैतिक कामामध्ये धोकादायक सहभाग यांच्यावर आत्मगौरव, महत्वकांक्षा व उपहासात्मकवृत्ती यांचा होणारा परिणाम अभ्यासणे.

२)आत्मगौरव व महत्वकांक्षा, महत्वकांक्षा व उपहासात्मक वृत्ती, आत्मगौरव व उपहासात्मक वृत्ती यांचा पौगंडावस्थेतील मुलींच्या वर्तनावर परस्पर होणारा परिणाम यांचा घटकात्मक अभ्यास करणे.

३) धोक्यात्मक प्रवृत्ती व असामाजिक व अनैतिक काम यांच्यावर परिणाम करणा-या (महत्वकांक्षा, आत्मगौरव व उपहासात्मक वृत्ती यांच्या होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

***निष्कर्ष -***

१) धोका पत्करुन काम करताना उच्च प्रकारची महत्वकांक्षा व सकारात्मक किंवा मध्यम स्वरुपाची आत्मगौरव वृत्ती यांची अधिक गरज असते.

२) धाडशी स्वभावावर उपहासवृत्ती, आत्मगौरव व महत्वकांक्षा यांचा स्वतंत्रपणे व एकाच वेळी परिणाम होतो.

३) धोकादायक वृत्ती आणि असामाजिक वर्तन यांच्यावर नकारात्मक उपहासवृत्तीचा अधिक परिणाम होतो.

४) अगदी सामान्य आत्मगौरव वृत्तीचा धोकादायक वृत्तीवर सामान्य परिणाम होतो.

५) अनैतिक वा असामाजिक वर्तनावर आत्मगौरव वृत्ती व महत्वकांक्षा वृत्तीचा फार मोठा परिणाम दिसून येत नाही.

**4) Mankad, R.B.(1982). An Analytical study of problems of Adolescence in Rajkot (Fourth Survey of Reserch in Education 1983-1988).**

***उद्दिष्टे -***

१० वी, ११ वी व विदयापीठ पूर्व परीक्षा व प्रथम वर्ष विद्यापीठ स्तरावर शिकणा-या पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या प्रश्नासंबंधी पृथ्यकरणात्मक अभ्यास करणे.

***निष्कर्ष -***

१) भावनिक, नैतिक व धार्मिक प्रश्नाशिवाय इतर प्रश्नामध्ये इतर बाबतीत मुलींपेक्षा मुलांच्या बाबतीत अनेक प्रश्न आहेत.

२) शारीरिक आरोग्य, शारीरिक सौंदर्य तसेच कौटुंबिक नाती आणि परस्पर नातेसंबंध याबाबतीत कॉलेजला जाणा-या विदयार्थ्यांपेक्षा हायस्कूलमध्ये जाणा-या मुला-मुलींचे प्रश्न अधिक वैशिष्ठ्यपूर्ण असतात तर आर्थिक बाबतीत कॉलेजला जाणा-या विदयार्थ्यांचे प्रश्न अधिक असतात.

३) खालील ५ प्रश्नांबाबत एकूणच अधिक तीव्रता अभ्यास गटातील मुला मुलींच्या बाबतीत दिसून आली.

१) मला अभ्यासात चांगले गुण मिळतील किंवा कसे याबद्दल अधिक काळजी वाटते.

२) सद्वर्तन असणा-या मुला - मुलींना अधिक ताण तणाव सहन करावा लागतो.

३) अपेक्षीत काम न झाल्यास अधिक नैराश्य येते.

४) इतर विदयार्थी आपला विकास कसे करतात यावर अधिक जागृक असतो.

५)मला उत्तर येत असूनही वर्गात विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यास असमर्थ असतो. सर्वसाधारणपणे उत्तर देणा-या विदयार्थ्यांचे प्रमाण ६९.६० ते ७९.९ असते.

**5)Mishra, Ram, Rajesh. (1989). <u>Identify Problems and needs of adolescents in Madya Pradesh.</u> (sixth survey of Research in Education. (1994-2000).**

***उद्दिष्टे -***

मध्यप्रदेशातील पौगंडावस्थेतील मुला मुलींचे प्रश्न व गरजा समजून घेणे.

***निष्कर्ष -***

१) पौगंडावस्थेतील मुला मुर्लींना सामान्यतः लैंगिक शिक्षणाची गरज वाटते.

२) सर्व्हे केल्यानुसार बहुसंख्य मुलामुर्लींना खालील बाबतीत आपलेज्ञान वाढविणे गरजेचे वाटते. आरोग्य, लैंगिकता, पुनरुत्पादन आणि लैंगिक शिक्षणाविषयी असणारे प्रश्न.

३) सर्व्हेनुसार जवळजवळ ८९ टक्के मुला-मुर्लींनी लैंगिक शिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

४) जवळजवळ ६६ टक्के मुला मुर्लींना पालकांच्या समवेत लैगिक शिक्षण व पौगंडावस्थेतील वयात होणारे शारीरिक बदल यांची चर्चा होताना उपराध्या सारखे वाटले.

**6) Panachakel, Thomas. kutty. (1991). <u>Health Education and Community Development (Fifth Survey of Research In Education (1988-1993).</u>**

***उद्दिष्टे -***

१) आरोग्य शिक्षणाचा समुदाय विकासावर होणा-या परिणामांचा अभ्यास.

***निष्कर्ष -***

१) सामान्यतः सामाजिक व आर्थिक स्थिती, कौटुंबिक उत्पन्न मातांची साक्षरता, कर्जबाजारीपणा, बचत, सहाय्यक उद्योग, सहकारी सोसायटीतील सभासदत्व, स्वच्छता गृहांचा उपयोग, आकाशवाणी वरील कार्यक्रम इ. बाबत राबविलेल्या समुदाय विकास उपक्रमांचा चांगला उपयोग झाल्याचे दिसून येते.

२) समुदायातील शिक्षित लोकांच्या बाबतीत विकास कार्यक्रमांचा उपयोग झालेला दिसून येतो. शौचालयांची उभारणी, आकाशवाणी कार्यक्रमांचे श्रवण, कुटुंब नियोजन आदी बाबतीत काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून आले.

## 7) Parekh, R. (1982). <u>Adolescents their social Background and problems.</u> <u>(Fourth survey of Research in Education Volume I (1983-1988). ).</u>

***उद्दिष्टे -***

१) भारतीय समाजातील सांस्कृतिक निती मूल्यांच्या पार्श्वभूमीवर पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या वास्तवतेचा पडताळा घेणे.

२) कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीचा व महाविद्यालयाच्या पार्श्वभूमीचा पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या जीवनावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

३) पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या प्रश्नांचा अभ्यास करणे.

४) पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या विचार प्रक्रिया व महत्त्वकांक्षा यांचा अभ्यास करणे.

***निष्कर्ष -***

१) पौगंडावस्थेतील काळ हा फारसा ताण तणावाचा वाटला नाही. या कालखंडामध्ये मुख्यतः प्रमाणापेक्षा अधिक कौटुंबिक सुरक्षितता लाभल्याने व सामाजिक पार्श्वभूमीमुळे सामान्यतः वयोवृध्दाबद्दल आदर असल्याने सदरचा काळ हा अधिक शांत व सुसहय वाटला.

२) सदर काळात या वयातील मुले आणि मुली मोठया प्रमाणावर कुटुंबावर अवलंबून आहेत असे दिसून आले.

३) या काळात सांस्कृतिक काही बदलांमुळे पोषाखीपणात व वागण्या बोलण्यात मुलांच्यात काही प्रमाणात मोकळीक दिसून आली.

४) ४० टक्के मुले मुली मूल्यांपासून विचलीत झालेली दिसून येतात.

५) या वयातील मुलांच्या वर्तनाविषयी निर्णय घेताना लैंगिक अवस्था महत्त्वाची ठरते.

६) या वयातील मुला मुलींवर सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा मोठया प्रमाणावर परिणाम दिसून येतो.

७) सामान्यतः मुलींपेक्षा मुले खेळाकडे अधिक आकर्षित झालेली दिसतात तर मुली दृकश्राव्य साधनांकडे आकर्षित होतात व त्यांना गप्पा मारण्यामध्ये स्वास्थ्य वाटते. मुलींना शिक्षण म्हणजे केवळ शैक्षणिक बाब वाटते तर मुलांना ती फावल्या वेळातील बाब वाटते.

८) मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रम तर मुलींना कलात्मक अभ्यासक्रमाची आवड अधिक असल्याचे दिसून येते.

**8) Purnima (1996). <u>The health, personal hygiene and nutritional status of 300 rural teenage girls aged 13 to 18 years</u>. (sixth survey of research in education 1994-2000 volume I ).**

***निष्कर्ष -***

सामान्यतः वाढणारे वय आणि होणारे मानसिक बदल यामुळे या काळात शरीरिक वृध्दी व वजन शास्त्रीयदृष्टया वाढणे गरजेचे असते व ते वाढल्याचे ही जाणवते. तसेच शारीरिक

वाढीच्या वेगवेगळया स्तरावर मुलींना रोग प्रतिकारक लसीकरण केलेले असते. तसेच पोषण मूल्य अधिक असणारा समतोल आहार घेणे हे उत्तम आरोग्यासाठी आवश्यक असते अशी ही जाणीव दिलेली असते. उत्तम आहार व वजन व उंची यांचा परस्पर संबंध असतो. याची जाणीवही झालेली दिसून येते. सामान्यतः आरोग्य तपासणीत मुलींमध्ये रक्तक्षय (रक्ताची कमतरता) व कुपोषण दिसून येते. तसेच प्रोटिन, लोह, कॅल्शिअम यांचा अभाव तसेच अपु-या कॅलरीज असलेला आहार दिसून येतो.

**9) Verghese, Marry. (1991). <u>Application study of the health status of Primary school pupils and its influence on achievement for framing a school health programme</u> (Fifth survey of Research In Education II volume (1988-1992).**

***उद्दिष्टे -***

१) प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांची आरोग्यविषयक स्थिती व संपादणूक यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.

२) प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या आरोग्यविषयक स्थिती व संपादणूक यांच्यातील परस्पर संबंधांवर बुध्दीमत्तेच्या होणा-या परिणामाचा शोध घेणे.

३) प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या आरोग्यविषयक स्थिती व संपादणूक यांच्यातील परस्पर संबंधावर होणा-या परिणामाचा शोध घेणे.

४) प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या आरोग्यविषयक स्थिती व संपादणूक यांच्यातील परस्पर संबंधावर इयत्तेचा होणा-या परिणामांचा शोध घेणे.

५) शालेय आरोग्य कार्यक्रमासाठी सूचना सुचविणे.

***निष्कर्ष -***

१) विदयार्थ्यांचे वर्गीकरण हे त्यांच्या आरोग्याच्या स्थितीवरुन करण्यात आले.

२) चांगले आरोग्य असणा-या मुलांची टक्केवारी जास्त आहे.

३) मुले आणि मुली यांच्या आरोग्यविषयक वर्गीकरणात तफाव आढळत नाही.

४) १,२,३,४ च्या सर्व गटातील मुले आणि मुलांच्या आरोग्यविषयक स्थिती व संपादणूकी विषयी सार्थ एकत्रीकरण आढळून आले.

५) प्रयोगासाठी निवडलेल्या संपूर्ण न्यादर्श असणा-या १,२,३,४ च्या सर्व मुला मुलींमध्ये आरोग्यविषयक स्थिती, बुध्दिमत्ता यामध्ये फरक नाही.

६) आरोग्यविषयक स्थितीमध्ये ५ पैकी ३ वर्गामध्ये बुध्दिमत्ता व संपादणूकीमध्ये सार्थ आणि होकारात्मक संबंध दिसून येतो.

## *२. ४ संदर्भ साहित्य व संबंधी संशोधनांचा प्रस्तुत संशोधनासाठी झालेला उपयोग.*

प्रस्तुत संशोधनामध्ये आरोग्य, ग्रामीण भाग, पौगंडावस्था, पौगंडावस्थेतील मुली तसेच जीवन कौशल्य या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधिकेने संदर्भ साहित्य म्हणून दिलेल्या साहित्यामध्ये वरील सर्व घटकांचा अंतर्भाव होत असल्याने हे साहित्य संशोधनास अतिशय उपयुक्त ठरले. त्याचप्रमाणे संबंधीत संशोधने म्हणून ज्या संशोधनाचा अंतर्भाव या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे, त्यांचे विषय पौगंडावस्था, आरोग्य शिक्षण व जीवन कौशल्य हे असल्याने प्रस्तुत संशोधनाच्या विषयाशी ते निगडीत असल्यामुळे ही संशोधने प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शक ठरली. प्रस्तुत प्रकरणामध्ये दिलेल्या जीवन कौशल्यावर आधारीत असणाऱ्या जीवन कौशल्य विषयक संशोधनातील कांही घटकांचा

उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी झाला. तसेच या संशोधनामध्ये घेतलेले पौगंडावस्था विषयीची संशोधने ही संशोधिकेस प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष लिहिताना अतिशय मार्गदर्शक ठरली.

## २. ७ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास करताना अनेक विषय समोर आले, या विषयामध्ये प्रामुख्याने पौगंडावस्थेतील मुलींच्या गरजा, त्यांची स्व संकल्पना, ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींचे शाळेतील समायोजन, ग्रामीण व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या स्व संकल्पना, पौगंडावस्थेतील मुलींच्या ठिकाणी असणारी आरोग्य विषयक जाणीव व त्यांची अभिवृत्ती अशा अनेक विषयावर आजपर्यन्त संशोधने झाली आहेत, परंतु पौगंडावस्थेतील मुलींच्या ठिकाणी आवश्यक जीवन कौशल्ये विकसीत करण्यासाठी आवश्यक असणारे संशोधन अभावानेच आढळते. तसेच ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य विषयक जाणीवा व जीवन कौशल्य यांचा विचार संशोधनाच्या दृष्टीने केला गेला नाही. आजची जगातील सगळयात मोठया प्रमाणावर पिढी ही पौगंडावस्थेतून जात आहे. या वयामध्ये या मुलांकडून अनेक चूका घडत असतात आणि या चुकांची परिणीती त्यांचे आयुष्य उध्वस्त होण्यामध्ये होत असते. या सगळयापासून या पिढीला जर वाचवायचे असेल तर पौगंडावस्थेतील या मुलांना योग्य पद्धतीने आरोग्य शिक्षण देवून त्यांच्यामध्ये योग्य जीवन कौशल्य रुजविली तर भावी पिढी ही निरोगी व निरामय निर्माण करता येईल, आणि त्यासाठी आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने निवडला.